# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २५९ /०८ दिनांक :

१) श्री. दत्तात्रय जगन्नाथ शिंदे अर्जदार
मु. पो. शेगांव, ता. जत,
जि. सांगली.

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा
नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,
संवसु मंडल कार्यालय, विश्रामबाग,
सांगली.

२) कार्यकारी अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित. विरूध्द पक्षकार
कवठे महांकाळ, सांगली.

३) सहाय्यक अभियंता,

म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
उप विभाग, जत,
जि. सांगली.

**<u>कोरम</u> :–** १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव

## <u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>

(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार



## <u>न्याय निर्णय</u>

<u>श्री. के.वाय.जगताप, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच यांचेतर्फे</u> दिनांक :

सदरील तक्रार अर्जदार यांनी घरगुती वीज कनेक्शन मिळणेसाठी तारीख १६.६.२००८ रोजी नियमाप्रमाणे वि.प.कडील संबंधित कार्यालयात रक्कम भरली होती. तसेच घरामध्ये वीज कनेक्शन करिता वायरिंग केल्याचा टेस्ट रिपोर्ट पोष्टाने उप विभाग जत येथे पाठविला होता. पुढे दिनांक ८.७.२००८ रोजीचा अर्ज अध्यक्ष, अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल केला. त्या अर्जानंतर ४ महिने होऊनही विद्युत पुरवठा केला नाही असा तक्रार अर्जाचा निकाल देण्यात आला नाही. सबब श्री. शिंदे यांनी १२.११.२००८ अशी तारीख असलेला अर्ज या मंचाकडे पोष्टाने पाठविला, तो अर्ज या मंचाकडे तारीख १८.११.२००८ रोजी प्राप्त झाला. त्यानुसार अर्ज नोंदवून वि.प.स म्हणणे देण्यासाठी नोटीस देण्यात आली.

वि.प.तर्फे म्हणणे देण्यात आले की, ता. १६.६.२००८ रोजी अर्जदाराने विद्युत पुरवठ्यासाठी रक्कम भरली होती. त्याचा तारीख २.७.२००८ रोजी टेस्ट रिपोर्टही दिलेला होता. सदर कामामध्ये ०.१८ कि.मी. एल.टी. लाईन आवश्यक होती. ती करण्यात आली परंतु अर्जदाराच्या घरामध्ये ता. २.७.२००८ चे टेस्ट रिपोर्ट प्रमाणे वायरींगचे काम झाले नव्हते. तसेच वि.प.तर्फे संयुक्त पाहणी अहवाल ता. २१.१०.२००८ दाखल असून त्यानुसार संबंधित घरामध्ये वायरींग केले नसल्याचे दिसून आले आहे. यावर श्री. बागडे यांची सही आहे. मात्र पुढे सदर तक्रार अर्जदाराने वायरींगचे काम पूर्ण केले व नव्याने टेस्ट रिपोर्ट दाखल केला. त्याप्रमाणे लागलीच मुदतीमध्ये ता. १८.१२.२००८ रोजी सदर तक्रार अर्जदारास विद्युत पुरवठा करण्यात आला आहे. त्याप्रमाणे तक्रार अर्जदाराने त्यास विद्युत पुरवठा मिळाला असून त्याची आता तक्रार राहीलेली नाही असे लिहून दिलेले आहे. सबब मुदतीमध्ये विद्युत पुरवठा न होण्याचे कारण म्हणजे तक्रार अर्जदाराचे वायरींगचे काम पूर्ण झाले नव्हते हे होय. परिणामी, वि.प.स कोणताही दोष देता येत नाही. तसेच तक्रार अर्जदाराची तक्रार राहीलेली नाही. सबब अर्ज निकाली काढणे क्रमप्राप्त ठरते. सबब खालील प्रमाणे आदेश.

## <u>आदेश</u>

१) तक्रारदाराचा अर्ज फेटाळण्यात येत आहे.
२) खर्चाबाबत आदेश नाही.

३)	या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

( काकासाहेब य . जगताप )
अध्यक्ष,
दिनांक : ०५.०१.२००८	ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव ..